**नियमित दिवाणी दावा क्र.३४७/२०१२**

**निशाणी क्रमांकः– १९२**

**<u>प्रतिवादी नं. ३ ते ५ तर्फे उलटतपास विद्वान वकील श्री. आर.ए.शेख यांचेमार्फतः–</u>**

२४. माझे शिक्षण वर्ग १२ वी पर्यत झाले आहे मला मराठी व इंग्रजी लिहिता व वाचता येते मला रे.मु नं १३७/१९९८ ची माहीती नाही तो दावा कशासाठी दाखल केलेला होता त्याबाबत मला माहिती नाही हे मला माहित नाही की त्या दाव्यात दावा मिळकती बाबत प्रतिवादी नं १ ते ५ यांच्या मध्ये वाटण्या झाल्या होत्या हे मला माहित नाही की, त्या हुकुम नाम्याच्या आधारे रे.द.नं ५४/२००० झाली होती. त्यानंतर दावा मिळकतीचा वाटप तक्ता तयार झाला होता. हे मला माहित नाही की, दिनांक २५/०७/२०११ रोजी प्रतिवादी नं. १ ते ६ यांना दावा मिळकत जमीन वाटप करुन ताब्यात देण्यात आली होती, त्यावेळेस पंच म्हणुन विठठल घोडेचोर , किशोर खामेकर व लक्ष्मण वामन बर्डे हे होते हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी नं १ ते ६ यांना ताबादिल्यानंतर तहसिलदार नेवासा यांच्या कडे अहवाल पाठवण्यात आला होता. हे मला माहित नाही सदरवाटपास फेरफार नं. ३५९० देण्यात आला हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकत जमीन ही प्रतिवादी नं ३ ते ५ यांच्या ताब्यात आहे

२५. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीचे माझ्या हक्कातील खरेदी खत खोटे आहे. दावा मिळकतीवर माझा कधीही ताबा नव्हता. हे म्हणणे खरे नाही की,प्रतिवादी विरुध्द मी खोटा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की,मी

आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

SUNIL NAGORAO BHOSLE

Digitally signed by SUNIL NAGORAO BHOSLE
Date: 2026.01.06 10:34:44 +0530

**(एस. एन.भोसले)**

दिनांक : ०५/०१/२०२६

दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,

नेवासा